FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0167748

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे भ्र.प्र.वि.मुं पहिली खबर क्र. २२, वर्ष २०२०, दिनांक २३-११-२०२०
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून २०/११/२०२०, वेळ १०.०० वा, तारीख पर्यंत २३/११/२०२०, वेळ १२.४४ वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २३/११/२०२०, वेळ १२.५५ वा.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ४०/२०२०, तारीख २३/११/२०२० वेळ २३.५० वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा २८ कि.मी. उत्तर, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव 'के' पश्चिम, म.न.पा. कार्या. अंधेरी (प), मुं-४०००५८, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव कुतबुद्दीन अब्दुल गफूर आवटी
Name
(b) वडिलांचे / पतीचे नाव अब्दुल गफूर आवटी
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४७ वर्षे
Date of Birth and Age
(d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९८२०९४२७५६
Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता बी.एम.सी. स्कुल समोर मक्का मस्जीद जवळ गिल्बर्ट हिल रोड, मुं-४०००५८
गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., ........ कार्ड नं Card No. ........
Address
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपार्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

वैजनाथ पंढरीनाथ सपाटे, व्यवसाय नोकरी (दुय्यम अभियंता) के-पश्चिम, म.न.पा. कार्यालय, पालिका मार्ग, अंधेरी (प) मुं. ५८. रा.ठि. सी-७, बी.एम.सी. क्वार्टर्स, मरोळ मरोशी रोड, अंधेरी (पु) मुं. ४०००५९

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

फिर्यादी कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आली असुन ही प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावी

समक्ष

(signature)

नितिन नवांडे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुं.

Q. (signature)

कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी

फिर्याद दिनांक १३/११/२०२०

कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी, वय ४७ वर्षे, धंदा– प्लंबर, रा.ठि. – बी.एम.सी. उर्दु स्कुल समोर, मक्का मस्जिद जवळ, गिलबर्ट हील रोड, अंधेरी (प), मुंबई ४०००५८. मोबाईल नं. ९८२०९४१७५६

मी वरील प्रमाणे असुन वर दिलेल्या पत्यावर जन्मापासुन वास्तव्यास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी व ०४ आपत्ये आहेत. माझे १०वी पर्यत शिक्षण झाले असुन मी सन २०१४ पासुन अंडर लायसंन्स प्लंबर म्हणुन काम करतो.

मी रहात असलेल्या अंधेरी (प.) परिसरातील बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या के/पश्चिम वार्ड अंतर्गत येणाऱ्या रहिवाशांना पाण्याच्या नळाचे नवीन कनेक्शन घ्यावयाचे असल्यास संबधीत रहिवाशी हे माझे सारख्या अंडर लायसंन्स प्लंबर (ULP) यांचेशी संपर्क करतात. आम्ही त्यांच्याकडे रेशनकार्ड व आधार कार्ड असल्याची खात्री करून पुराव्या दाखल त्यांच्या छायांकीत प्रती घेवून बी.एम.सी. रजिस्टर्ड लायसंन्स प्लंबर यांचेकडे घेवून जातो व त्यांचा रजिस्टर्ड लायसंन्स नंबर टाकून बी.एम.सी. च्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करतो व त्याचे रू. ६५०/– इतके शुल्क भरतो. त्यानंतर संबधीत रजिस्टर्ड लायसंन्स प्लंबर हे त्यांच्या रजिस्टर्ड लायसंन्सची छायांकीत प्रत तसेच ऑथॉरीटी लेटर देऊन संबधीत फाईलचा बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या वॉटर डिपार्टमेंटकडून पाठपुरावा करून मंजूर करून घेण्यासाठी माझे सारख्या अंडर लायसंन्स प्लंबरची नियुक्ती करतात. त्यानंतर आम्ही रहिवाशांकडून घेतलेले आधार कार्ड, रेशन कार्ड व लायसंन्स होल्डर कडून घेतलेल्या रजिस्टर्ड लायसंन्सची छायांकीत प्रत, ऑथॉरीटी लेटर, रू. १००/– च्या स्टॅम्प पेपरवर रजिस्टर्ड लायसंन्स प्लंबरचे प्रतिज्ञापत्र व ऑन लाईन अर्जाची प्रत इत्यादी कागदत्राची फाईल तयार करून बी.एम.सी. मधील वॉटर डिपार्टमेंटच्या आर.ए. (रेकॉर्ड असिस्टंट) विभागात जमा करतो व त्यानंतर सदर फाईलवर स्टॅड पोस्ट के डब्ल्यु (SPKW) नंबर पडतो त्यानंतर सदरची फाईल हि हेड क्लर्क, एरीया कन्सर्ड ऑफिसर, ज्युनिअर इंजिनिअर, सब इंजिनिअर, असिस्टंन्ट इंजिनिअर यांचकडे जाते. असिस्टंन्ट इंजिनिअर यांच्याकडून फाईलला मंजूरी मिळाल्यानंतर ती फाईल पुढील अंतिम पुर्ततेकरीता सब इंजिनिअर, मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट यांचेकडे नळाच्या नवीन जोडणीकरीता पाठविली जाते. त्याप्रमाणे संबधीत फाईलचा पाठपुरावा आम्ही उपरोक्त नमुद संबधीत अधिकाऱ्यांकडे जावून करतो. त्यानंतर सब इंजिनिअर, मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट हे नवीन नळाच्या जोडणीकरीता पावती तयार करून बी.एम.सी. च्या नळ जोडणी लेबर यांना देवून नळ जोडणी करण्याकरीता पाठवितात.

दिनांक ०१/०९/२०२० रोजी अनिस अब्दुल अझीज शेख, राहणार शास्त्री नगर, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई हे नवीन नळ जोडण्याच्या कामासंदर्भनि माझेकडे आले. त्यानंतर मी नळ जोडणीच्या जागेची पाहणी केली व त्यांच्याकडून आधार कार्ड तसेच रेशन कार्डची खात्री करून छायांकीत प्रत घेतली. त्यानंतर मी बी.एम. सी. रजिस्टर्ड लायसंन्स प्लंबर नामे श्री. मोहन जी. मानेकर, रजिस्टर्ड लायसंन्स नं. 2097 यांचेकडे जावून अनिस अब्दुल अझीज शेख यांचे रेशन कार्ड व आधार कार्डाच्या छायांकीत प्रतीवर मोहन मानेकर यांचा सही शिक्का घेतला. त्यानंतर मोहन मानेकर यांचा रजिस्टर्ड लायसंन्स नं. 2097 घेवून दिनांक ०८/०९/२०२० रोजी बी.एम.सी. च्या वॉटर वेबसाईटवर ऑन लाईन ॲप्लीकेशन केले. त्याचा आयडीएन (IDN) नंबर 120090800069 असा आहे. त्यानंतर रू. ६५०/– चे शुल्क भरले व दिनांक ०९/०९/२०२० रोजी सर्व संबधीत कागदपत्रांची फाईल आरए (रेकॉर्ड असिस्टंट) वॉटर डिपार्टमेंट यांच्याकडे जमा केली. त्याचा फाईल क्र. SPKW-5873 असा आहे. त्यानंतर सदरची फाईल हि हेड क्लर्क, एरीया कन्सर्ड ऑफिसर, ज्युनिअर

फिर्यादी कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी यांची फिर्याद पुढे चालू.

इंजिनिअर, सब इंजिनिअर, असिस्टंन्ट इंजिनिअर यांचेकडून मंजूरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करीता सब इंजिनिअर, मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट यांच्या कार्यालयात आल्याची मला माहिती मिळाल्याने मी दिनांक १२/११/२०२० रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट चे सब इंजिनिअर वैजनाथ सपाटे यांना जावून समक्ष भेटलो व संबधीत मंजूर फाईलच्या नळ जोडणी संदर्भात वॉटर कनेक्शन पावती व लेबर देण्याबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी माझेकडे सदर कामासाठी रू. २,०००/– च्या लाचेची मागणी केली. माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १२/११/२०२० रोजी सदर बाबत वरळी, मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबधक विभागात जावून रितसर तक्रार दिली.

माझे लेखी तक्रारीवरून पोलीस निरीक्षक नितीन लवांडे यांनी दोन सरकारी पंचाना बोलावून घेतले तसेच सपोआ आबासाहेब पाटील व नमुद दोन सरकारी पंच यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे वैजनाथ सपाटे हे लाचेची मागणी करतात अगर कसे याची पडताळणी करण्याकरीता त्यांच्या कार्यालयात जावयाचे असल्याने मी, दोन सरकारी पंच, पो.नि. लवांदे, सपोआ आबासाहेब पाटील व पोलीस स्टाफ असे सर्व पडताळणी करीता आवश्यक त्या साहित्यासह शासकीय वाहनांनी अंधेरी (प.) येथे रवाना झालो. सदर ठिकाणी मला व पंचाना पो.नि. लवांडे यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. लवांडे यांनी माझे शर्टाच्या आतील बाजूस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून लावला. त्यानंतर मी व सरकारी पंच श्री. संदेश मनोहर चव्हाण असे आम्ही दोघे बी.एम.सी. के/पश्चिम वार्ड, अंधेरी (प.) येथील मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट चे सब इंजिनिअर वैजनाथ सपाटे यांची त्यांच्या बेसमेंट येथील कार्यालयात भेट घेतली व यारी रोडच्या नळ जोडणी कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी " रोड रहेगा तो नही होगा, डांबर निकालनेका रहेगा तो फिर नही होगा" असे सांगीतले. समक्ष भेटीदरम्यान वैजनाथ सपाटे यांनी नळ जोडणी कामाच्या संदर्भात लाचेची मागणी न केल्याने सदरची पडताळणी स्थगीत करण्यात आली.

त्यानंतर दिनांक १३/११/२०२० रोजी वैजनाथ सपाटे यांच्या कार्यालयात पुन्हा जावून त्यांची भेट घेवून लाचे संदर्भात पडताळणी करण्याकरीता दिनांक १२/११/२०२० रोजी ठरल्याप्रमाणे मी सकाळी ०९.१५ वा. अंधेरी (प.) रेल्वे स्टेशनच्या बाहेर पोहचलो. तेथे दोन सरकारी पंच, पो.नि. लवांदे, सपोआ आबासाहेब पाटील व पोलीस स्टाफ असे सर्व पडताळणी करीता आवश्यक त्या साहित्यासह शासकीय वाहनांनी पोहचले. त्यानंतर सदर ठिकाणी मला व पंचाना पो.नि. लवांडे यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. लवांडे यांनी माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून लावला. त्यानंतर मी व सरकारी पंच श्री. संदेश मनोहर चव्हाण असे आम्ही दोघे बी.एम.सी. के/पश्चिम वार्ड, अंधेरी (प.) येथील मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट चे सब इंजिनिअर वैजनाथ सपाटे यांच्या बेसमेंट मधील कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली व नळ जोडणीच्या कामा संदर्भात विचारले असता त्यांनी 'तेरा फिक्स हि है, दो हजार, एक बार बोल दिया तो बोल दिया, बस ठिक है' असे बोलून लाचेची मागणी केली त्यावर मी त्यास 'दो हजार, उतना नही है साब' असे बोललो असता त्यांनी "दो बोला ना" असे सांगीतले त्यावर मी "दो हजार" असे बोललो असता त्यांनी त्यास होकार दिला. त्यानंतर मी व पंच असे आम्ही दोघे त्यांच्या कार्यालयातून शासकीय वाहनाजवळ आलो. सदर ठिकाणी पो.नि. लवांडे व सपोआ आबासाहेब पाटील यांनी पंचाना व मला वैजनाथ सपाटे यांच्या भेटीदरम्यान झालेल्या संभाषणाबाबत विचारपुस केली व व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण लक्षपुर्वक ऐकले असता वैजनाथ सपाटे यांनी लाचेची मागणी केली असल्याची खात्री पटली.

समक्ष

(नितीन लवांडे)

फिर्यादी कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी यांची फिर्याद पुढे चालू.

त्यानंतर पो.नि. लवांडे व सपोआ आबासाहेब पाटील यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत तसेच अॅन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्माबाबत मला, पंचाना तसेच सापळा पथकास मार्गदर्शन व सुचना दिल्या. त्यावेळी मी माझेकडील रु. २,०००/– (रु. ५०० च्या ०४ भारतीय चलनी नोटा) पो.नि. लवांडे यांचेकडे दिल्या. त्यांनी सदर नोटांवरील नंबर नोंद करून घेतले. त्यानंतर पोनि. लवांडे यांनी पोलीस वाहनावरील पोलीस चालक किशोर भोसले यांचेमार्फत रु. २,०००/– रकमेस पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने लावली. सदरहु नोटा पोलीस चालक भोसले यांनी पंचासमक्ष त्यांचे हाताने माझे शर्टाचे पुढील डाव्या बाजुच्या खिशात ठेवल्या. गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून शासकीय वाहनातच माझे तसेच पंच व पोनि लवांडे यांचे वक्तव्य डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर सापळा कारवाई करीता पो.नि. लवांडे यांनी माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून लावला. त्यानंतर मी व सरकारी पंच श्री. संदेश मनोहर चव्हाण असे आम्ही दोघे बी. एम.सी. के/पश्चिम वार्ड, अंधेरी (प.) येथील मेंटनंन्स वॉटर डिपार्टमेंट चे सब इंजिनिअर वैजनाथ सपाटे यांच्या बेसमेंट मधील कार्यालयात भेट घेण्यासाठी जात असताना ते लिफ्टने वरच्या दिशेने गेल्याचे मी पाहिले. त्यामुळे माझे माहिती प्रमाणे ते इमारतीच्या चौथ्या माळयावरील वॉटर डिपार्टमेंट मध्ये गेले असल्याची शक्यता मला वाटल्याने मी पंचासह चौथ्या माळयावरील वॉटर डिपार्टमेंटच्या कार्यालयात पोहचलो. तेथील एका केबीन मध्ये मी वैजनाथ सपाटे यांची भेट घेतली. त्यावेळी पंचासमक्ष त्यांनी माझेकडून रू. २,०००/– स्विकारून त्यांच्या नेसनीस असलेल्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. वैजनाथ सपाटे यांनी लाच स्विकारल्यानंतर मी माझे डोक्यावरून हात फिरवून पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी माझ्या आजुबाजुला असलेले सापळा पथक व पंच तेथे हजर झाले व त्यांनी वैजनाथ सपाटे यांचे दोन्ही हात पकडले व पोनि लवांडे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले.

पोनि लवांडे यांनी वैजनाथ सपाटे यांना स्वत:ची ओळख करुन दिली व लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाचेची रक्कम त्यांचे शर्टाच्या वरच्या खिश्यात ठेवली असल्याचे सांगितले. पोनि लवांडे यांचे सुचनेप्रमाणे पंच श्री. सचिन संखे यांनी वैजनाथ सपाटे यांच्या शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिश्यातील लाचेची रक्कम काढुन ती स्वत:चे ताब्यात घेतली. त्यावेळी पो.नि. लवांडे यांनी सदर नोटांबाबत खात्री केली असता त्यावरील नंबर हे सापळा कारवाईत वापरलेल्या नोटांच्या नोंद केलेल्या नंबर प्रमाणेच असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर पोनि लवांडे यांचे सुचनेप्रमाणे सदर ठिकाणी कृत्रीम अंधार करून माझ्या हातांची, कपडयांची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली तेंव्हा माझे उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व शर्टाच्या डाव्या बाजुवरील खिश्याच्या तोंडास व आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले तसेच वैजनाथ सपाटे यांच्या हातांची, कपडयांची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली असता त्यांच्या उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व शर्टाच्या डाव्या बाजुवरील खिश्याच्या तोंडास व आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व वैजनाथ सपाटे असे आम्ही सर्व शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

समक्ष
(नितीन लवांडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक वि., मुंबई.

फिर्यादी कुतबुद्दीन अब्दुल गफुर आवटी यांची फिर्याद पुढे चालू.

वैजनाथ सपाटे यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच त्यांना लाच म्हणुन देण्यासाठी आणलेली लाचेची रक्कम रू. २,०००/— ही माझे वैयक्तीक बचतीतून आणलेली आहे.

तरी दिनांक १३/११/२०२० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभाग, अंधेरी (पश्चिम) येथील वॉटर मेंटनंन्स विभागातील सब इंजिनिअर (दुय्यम अभियंता) श्री. वैजनाथ पंडितराव सपाटे यांनी अनिस अब्दुल अझीज शेख, राहणार शास्त्री नगर, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई यांच्या नवीन नळ जोडणीचे फाईल क्र. SPKW -5873 च्या प्रलंबित असलेल्या वॉटर कनेक्शन पावती करीता माझेकडे रू. २,०००/— च्या लाचेची मागणी करून ती पंचासमक्ष माझेकडून स्विकारली असता सापळा पथकाने रंगेहाथ पकडले म्हणुन माझी त्यांच्या विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती वाचुन पाहिली तसेच मला हिंदीतून समजावून सांगीतली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(नितीन लवांडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तत्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी हे प्लंबरचे काम करीत असुन त्यांच्याकडे स्वानिक शिवाजी यांचेकडुन आलेल्या नवीन नळ कनेक्शन कामाकरिता बी.एम.सी. रवा के/प अंधेरी (प), मुंबई येथे दाखल असलेल्या कामाची फाईल मंजुर झाल्यानंतर वर्क ऑर्डर काढण्याकरिता वॉटर मेन्टेनन्स विभागातील दुय्यम अभियंता लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडे पंचासमक्ष रु. २०००/- च्या लाचेची रक्कमेची मागणी करुन व ती स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)
[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name नितीन लवांडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1 न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1 Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3 Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**